# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाचे मुखपत्र)

Registered PRGI NO - MAHMAR | 2015 | 63869

वर्ष-१३ * मे २०२६ * अंक - ११ * पृष्ठ संख्या - १६




दि. १० एप्रिल २०२६ कलाग्राम, पु. ल. देशपांडे उद्यान
सहकार भारती तर्फे आयोजित सहकार महोत्सवात मार्गदर्शन करताना महासंघाचे अध्यक्ष श्री सुहास पटवर्धन



दिनांक १९ एप्रिल २०२६ - नक्षत्र फेज २ - पिंपरी संस्थेत समिती प्रशिक्षणासाठी उपस्थित सदस्य
व महासंघाच्या सचिव मनीषा कोष्टी, संचालक ॲड. मृद्गंधा जोशी

SIILC
Transforming Human Capital

**महाराष्ट्र राज्य सह. गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंट्स महासंघ मर्या.**
**आणि SIILC (SIMACES Learning LLP) सकाळ यांच्या संयुक्त विद्यमाने**

# सहकारी गृह. संस्थांच्या व्यवस्थापकासाठी (मॅनेजर) प्रशिक्षणाचे आयोजन

सहकारी गृह. संस्थांचे उपविधी, रजिस्टर्स, सर्वसाधारण सभा, लेखापरिक्षण, थकबाकी वसुली, नॉमिनेशन, सुरक्षा, पर्यावरण पूरक संस्था इ. विषयांवर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण.

**प्रशिक्षण दिनांक : १९, २० व २१ जुन २०२६**
**वेळ : सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत**

**✻ प्रशिक्षण शुल्क ✻**
**प्रत्येकी रू. १०,०००/- (प्रति व्यक्ती)**
चहा, भोजन, अभ्यासटीपण, प्रमाणपत्रासह

**Payment : ACCOUNT Details**
**Name:** Pune Dist. Co-Op. Hsg. Soc. And Apt. Fed. Ltd
**Account No.:** 045209100000063
**Bank:** Sarswat Bank **Branch:** Narayan Peth, Pune
**IFSC:** SRCB0000045

सध्याचे व्यवस्थापन समिती सदस्य, व्यवस्थापक होऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती तसेच संस्थेतील सदस्य या प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतात. तरी त्वरित नाव नोंदणी करावी.

✻ पूर्वनावनोंदणी १७ जुन पर्यंत करावी.✻

संपर्क: **9689898360, 9112191611**

✻ स्थळ : SIILC मीडिया सेंटर, बाणेर रोड, औंध, पुणे ✻

# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाचे मुखपत्र)

संपादक : **सुहास पटवर्धन,** अध्यक्ष

पत्ता : ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेससमोर, पुणे - ४११०३०.

संपादन सहाय्य : **संचालक मंडळ**

**दूरभाष** : **०२०-२४४५४०१०**

**ई-मेल** : **punefed@gmail.com**

**वेबसाईट** : **www.punefed.com**

**यूट्यूब चॅनल** : **Pune District Housing Federation**

**इन्स्टाग्राम** : **instagram.com / maharashtrahousingfederation**



© : 'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित यांचे स्वाधीन



प्रकाशक : **श्री. सुहास केशव पटवर्धन**

मुद्रक : **श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस,** ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. भ्रमणध्वनी : ९८९००७३९४७


## अनुक्रमणिका


| क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे | ४ |
| २. | संपादकीय | ५ |
| ३. | तक्रार अर्जावर समितीची कार्यवाही-उपविधी | ६ |
| ४. | ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत परिपत्रक | १० |
| ५. | शंका-समाधान | १२ |
| ६. | एप्रिल - महासंघाचे सभासदत्व | १३ |
| ७. | नियमित पान | १४ |



'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्यादित यांचे मालकीचे असून त्यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक श्री. सुहास केशव पटवर्धन यांनी श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस, ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. येथे छापून ३१३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक - **सुहास केशव पटवर्धन,** मुद्रण स्थान : **श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस - ९८९००७३९४७**


***कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.***

**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्म्स, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस् पावती पुस्तके, व्हाऊचर्स यांची योग्य दरात विक्री महासंघाच्या मुख्य कार्यालयातून सकाळी १०.३० ते सायं. ५.३० या वेळेत करण्यात येते.**

१) भाडेकरू सहभागीदारी संस्था पोटनियम– (फ्लॅट टाईप) इंग्रजी व मराठी
२) संस्था नोंदणी फॉर्मस् संच
३) पोटनियम दुरुस्ती फॉर्मस् संच
४) सभासद फॉर्म (इंग्रजी व मराठी)
५) सहसभासद फॉर्म
६) ट्रान्सफर फॉर्म संच
७) फॉर्म 'ओ' (लेखापरीक्षण दुरुस्ती)
८) फॉर्म 'ओ' पुरवणी
९) नॉमिनेशन फॉर्म (इंग्रजी व मराठी)
१०) रोजकीर्द
११) सभासद रजिस्टर नमुना 'आय'
१२) J रजिस्टर
१३) शेअर रजिस्टर
१४) प्रोसिडिंग बुक
१५) पावती पुस्तके
१६) व्हाऊचर पुस्तके
१७) व्यवस्थापन मार्गदर्शिका
१८) वसुली पुस्तिका
१९) निवडणूक पुस्तक
२०) नॉमिनेशन रजिस्टर
२१) मॉर्गेज रजिस्टर

## महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे

- १. **स्कुलशॉपी –** दुकान क्र. ९, कॉर्पोरेशन बिल्डिंग, चैतन्य हॉस्पिटलसमोर, चापेकर चौक, चिंचवड, पुणे – ४११०३३. भ्रमणभाष : ९३२६०५४९०६
- २. **श्री स्टेशनर्स –** रेव्हेन्यू कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे भ्रमणभाष : ९२७३५०५६०४
- ३. **निशा कन्सल्टन्सी –** कृतिका अपार्टमेंट, ग्रीन फुड रेस्टॉरंट जवळ, कोथरुड, पुणे ४११०३८. भ्रमणभाष : ९८५०८८८९७९
- ४. **सोसायटी प्लस –** बाजीराव रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे–४११०३०. भ्रमणभाष : ९३७००८८९९५
- ५. **प्राईड साईन –** वडगाव धायरी, पुणे – ४११०४१. भ्रमणभाष : ९११२१९१६११
- ६. **सुकन्या निरगुडे –** एच–४२, एकता सोसायटी, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे – ४११०३८. (शाखा : सासवड, कोडीत) भ्रमणभाष : ९१५६४१४१९१
- ७. **मे. एस. जे. खामकर ॲण्ड असोसिएटस् –** मुंढवा घोरपडी रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, मुंढवा, पुणे – ४११०३६. भ्रमणभाष : ९६२५३४३४३४
- ८. **स्वाती पवार – समर्थ सर्व्हिसेस –** स.नं. ४३/२, शिवांजली लेन नं. ३, दत्तनगर, आंबेगाव, पुणे – ४११०४६. भ्रमणभाष : ९४०३९७८९४३.
- ९. **पी.एल. इंदोरे ॲण्ड असोसिएटस् –** कमलराज दत्तविहार सोसायटी, मोशी, चिखली रोड, मोशी, पुणे – ४१२१०५. भ्रमणभाष : ९७३०७६७५७९
- १०. **द स्टेशनरी आयकॉन –** शॉप नं. ६, तुषार कॉम्प्लेक्स, पेट्रोलपंप समोर, पौड रोड, भुगाव, पुणे – ४१२११५.
- ११. **कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, कोंढवा पोलिस स्टेशनमागे, पुणे – ४११०४८. दूरभाष : ०२०–४८६०७७१७
- १२. **सोसायटी स्मार्ट –** इस्टर्न विंग, जय गणेश विश्व, विश्रांतवाडी चौक, पुणे – ४११०१५. भ्रमणभाष : ९९६०८२९९९८
- १३. **शितल जाधव –** हिंजवडी पुणे को. ऑप. हाऊसिंग अलायन्स भ्रमणभाष : ८४८२८७३४४५
- १४. **चैतन्य पुरंदरे –** विश्वगंगा कॉम्प्लेक्स, संतोष हॉलजवळ, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे – ४११०५१. भ्रमणभाष : ९८६०८२०३९०

# पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ मर्यादित

punefed@gmail.com

♦ *संचालक मंडळ* ♦

| | |
|---|---|
| मा. सुहास पटवर्धन, अध्यक्ष | ९४२२००४७०१ |
| मा. सुभाष कर्णिक, उपाध्यक्ष | ९७६६६०६१४६ |
| सौ. मनीषा कोष्टी, सचिव | ९९२२४१९२१६ |
| मा. चारूहास कुलकर्णी, कोषाध्यक्ष | ९५५२५४६६०७ |
| मा. अनिल असगेकर | ९९६०६०८०७३ |
| मा. सुभाष ढवळे | ९४२१०५८२५५ |
| ॲड. मृद्गंधा जोशी | ८७६६४३२७६९ |
| मा. जुजर हैदरी | ९३७१०१७४४० |
| मा. शिवाजी उराडे | ९४२३०१५९९६ |
| मा. अजित चौगुले | ७७५७०२१९५३ |
| मा. विलास थोरात | ९८९००५४३५१ |
| ॲड. प्रकाश तोंडारे | ९७६३६०३३८४ |
| मा. समीर रुपदे | ९८५०५६७४७५ |
| मा. मनोहर देशपांडे | ९३७१०७३७२७ |
| मा. राजन प्रसादे | ९६०४२१२४३० |
| मा. संभाजी घुंडरे | ९८८१०७७२९६ |
| मा. संजय सूर्यवंशी | ९६२३९२९८८९ |
| मा. अव्हेलिनो नरोना | ९९७०४७३१८९ |

♦ *तज्ञ संचालक* ♦

ॲड. वसंतराव कर्जतकर

आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी

♦ *कार्यकारी संचालक* ♦

| | |
|---|---|
| कर्नल प्रमोद दहीतुले | ९९९९५३७४३२ |


## संपादकीय

उन्हाचा पारा वाढत आहे. सगळ्यांना पावसाची प्रतीक्षा आहे. झाडाच्या सावलीचे महत्त्व उन्हातच कळतं. तसंच झाडे लावून ती जोपासण्यासाठी आपण काय करू शकतो हा विचार प्रत्येकाने करावा. आपल्या संस्थेत किंवा जवळपास बागेत, टेकडीवर जागा असेल, तर जून महिन्यात झाडे लावण्यासाठी आत्तापासून तयारी सुरू करा. शक्यतो देशी वृक्ष निवडा. ते लवकर रुजतात. पर्यावरण संतुलनासाठी ते आवश्यक आहे. संस्थेतील शालेय विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेतल्यास त्यांना झाडांचे महत्त्व समजावून सांगून एकेकाला झाड जोपासण्याची जबाबदारी दिली, तर ते मनापासून करतील. पुढच्या पिढीने जागरूक होऊन पर्यावरणसंवर्धनकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे.

यादृष्टीने महासंघामार्फत शाळांमध्येही उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी याबरोबरच जास्तीतजास्त पर्यावरण पूरक उपक्रम घेण्याचा प्रयत्न करावा. जसे की ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती, निर्माल्यापासून खत, प्लास्टिक कचरा स्वतंत्रपणे एखाद्या संस्थेला देणे, पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर, इ. बाबतीत पुढाकार घेतला तर चांगला प्रतिसाद मिळेल.

चला तर मग

**पर्यावरणाची कास धरूया, पृथ्वीचे ऋण फेडूया**

**– मनीषा विजय कोष्टी**
**सचिव**

***


## वास्तुदर्शन मासिक जाहिरात दरपत्रक ✻ GST सह

| | ब्लॅक ॲण्ड व्हाईट | सिंगल कलर | फोर कलर |
|---|---|---|---|
| १/३ पान | २,३६०/- | - | - |
| अर्धे पान | ३,५४०/- | ४,७२०/- | - |
| पूर्ण पान | ४,७२०/- | ५,९००/- | १७,७००/- |
| पूर्ण दोन पाने | - | - | २३,६००/- |

✻ हे दर प्रत्येक महिन्यासाठी लागू राहतील.

✻ १२ महिन्यांसाठी जाहिरात दिल्यास वरील दरात एक महिन्याची सूट मिळेल.

# सदस्याच्या तक्रार अर्जावर कार्यवाही – ९७ व्या घटनादुरुस्तीनुसार आदर्श उपविधी

## एकोणीस – सदस्यांच्या तक्रारीचे निवारण करणे

**तक्रार अर्ज**

१७२. संस्थेचे एक किंवा अनेक सदस्य, तक्रारीचे स्वरूप स्पष्ट करणारे तक्रार अर्ज संस्थेच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याकडे लेखी स्वरूपात सुपुर्द करतील.

**तक्रार अर्जावर समितीची कार्यवाही**

१७३. तक्रार अर्ज प्राप्त झाल्यावर, समिती आगामी व्यवस्थापन समितीच्या सभेत त्या तक्रार अर्जावर निर्णय घेईल. हा निर्णय संबंधित सदस्यास, तो घेतला गेल्याच्या तारखेपासून १५ दिवसांचे आंत कळविला जाईल.

**करारनिविष्ट कालावधी दरम्यान संस्थेकडून काही कारवाई न झाल्यास तक्रार कोणाकडे करावी.**

१७४. जर सदस्याचे/ सदस्यांचे समितीच्या निर्णयावर समाधान झाले नाही तर किंवा समितीकडून १५ दिवसांच्या मुदतीत त्याला / त्यांना काहीही कळविण्यात आले नाही तर तक्रार करणारा सदस्य / करणारे सदस्य खाल निर्दिष्ट करण्यात आलेलय सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाद मागतील.

**(अ) निबंधक (Registrar)**

(एक) खोटी माहिती सादर करून संस्थेच्या नोंदणीबाबत.

(दोन) भागपत्र निर्गमित न केल्याबाबत.

(तीन) सदस्यत्वास नकार दिल्याबाबत

(चार) संस्थेकडून नामनिर्देशन नोंदणी न केल्याबाबत.

(पाच) भोगवटेतर शुल्काबाबत

(सहा) हस्तांतरणासाठी जादा अधिमूल्याची मागणी केल्याबाबत

(सात) अभिलेखाच्या आणि दस्तऐवजाच्या प्रती न पुरविल्याबाबत.

(आठ) संस्थेच्या अभिलेखामध्ये अनधिकृत बदल, तो दडपून टाकणे अथवा नष्ट करणे याबाबत.

(नऊ) समितीने धनादेश अथवा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न स्वीकारणे याबाबत.

(दहा) संस्थेचे अभिलेख व लेखापुस्तके न ठेवणे अथवा अर्धवट अवस्थेत ठेवणे याबाबत.

(अकरा) ठराविक अवधीमध्ये संस्थेचे वार्षिक हिशेब आणि अहवाल तयार न करणे याबाबत.

(बारा) संस्थेच्या निधीचा चुकीचा विनियोग अथवा निधी बाबत अफरातफर करणे याबाबत.

(तेरा) संस्थेचा कसुरदार/निरर्ह सदस्य याबाबत

(चौदा) संस्थेच्या निधीची सर्वसाधारण सभेच्या पूर्व संमतीशिवाय गुंतवणूक करणे याबाबत.

(पंधरा) हिशेबांचा मेळ बसविणे याबाबत.

(सोळा) समितीची मुदत संपण्याअगोदर कायद्यानुसार निवडणुका न घेण्याबाबत.

(अठरा) नामनिर्देशन फेटाळण्याबाबत.

(एकोणीस) ठराविक मुदतीमध्ये किंवा प्रत्येक वर्षी ३० सप्टेंबरपूर्वी सर्वसाधारण सभा न बोलाविणेबाबत.

(वीस) उपविधी मध्ये दर्शविल्याप्रमाणे समितीची बैठक आयोजित न करण्याबाबत.

(एकवीस) समितीने दिलेल्या राजीनाम्याबाबत.

(बावीस) निबंधकाच्या अखत्यारीतील इतर संबंधित विषय याबाबत.

(तेवीस) वार्षिक विवरण आणि विवरण पत्र न दाखल करण्याबाबत.

(चोवीस) क्रियाशील आणि अक्रियाशील सदस्यांची वर्गवारी करण्याबाबत.

**सहकारी न्यायालयाशी निगडित बाबी**

**(ब) सहकारी न्यायालय (Co-operative Court)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० याच्या कलम ९१ खाली अंतर्भूत असलेले सदस्य आणि किंवा संस्थेचे सदस्य यांच्यामधील खालील बाबींशी संबंधित विवाद सहकारी न्यायालयाकडे निर्देशित करण्यात येतील.

(एक) व्यवस्थापन समिती आणि सर्वसाधारण सभा यांचे ठराव;

(दोन) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५२ अ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे नामनिर्देशन फेटाळण्यात आले असेल ते खेरीज करून व्यवस्थापन समितीच्या निवडणुकांबाबत;

(तीन) मोठी/ दुरुस्ती, अंतर्गत दुरुस्ती आणि गळती यांसह दुरुस्त्या;

(चार) वाहने उभी करण्याची जागा;

(पाच) सदनिकांचे / भूखंडाचे वाटप;

(सहा) बांधकाम खर्चाच्या दरामध्ये वाढ होणे;

(सात) विकासक/ठेकेदार, वास्तुशास्त्रज्ञ यांची नेमणूक;

(आठ) असमान पाणीपुरवठा;

(नऊ) सदस्यांकडील थकबाकीची जादा वसुली;

(दहा) सहकारी न्यायालयाच्या अखत्यारीत येणारे इतर कोणतेही विवाद;

**दिवाणी न्यायालयाशी निगडित बाबी**

**(क) दिवाणी न्यायालय (Civil Court)**

खालीलप्रकारचे विवाद -

(एक) बांधकाम व्यवसायी/ विकासक यांनी/ यांच्यात करारपत्रामध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तींची पूर्तता न होणे;

(दोन) दुय्यम दर्जाचे बांधकाम;

(तीन) संस्थेच्या नावे मालमत्तेचे अभिहस्तांतरण पत्र;

(चार) बांधकाम दरामध्ये वाढ होणे;

(पाच) दिवाणी न्यायालयाच्या अखत्यारीत येणारे इतर कोणतेही विवाद

**स्थानिक प्राधिकरणांशी निगडित बाबी.**

**(ड) महापालिका/स्थानिक प्राधिकरण (Local Planning Bodies/ Authorities)**

खालील दर्शविलेल्या बाबी :-

(एक) बेकायदेशीर बांधकाम/जादा/पर्यायी बांधकाम : बांधकाम व्यवसायी/ सदस्य/ सदनिकेचा भोगवटादार यांच्याकडून करण्यात आलेले;

(दोन) संस्थेला व सदस्यांना होणारा अनियमित पाणीपुरवठा;

(तीन) सदस्याकडून/ भोगवटादाराकडून वापरामध्ये बदल;

(चार) इमारतीचे संरचना विषयक प्रश्न

(पाच) महापालिका/ स्थानिक प्राधिकरण यांच्या कार्यकक्षेत येणाऱ्या बाबी. उदा. मालमत्ता कर, रस्त्यावरील दिवे, कचरा आणि इत्यादी नागरी सुविधा.

**पोलिसांशी निगडित बाबी**

**(ई) पोलीस (Police Administration)**

खालील दर्शविलेल्या बाबी :-

(एक) सदस्य/ बांधकाम व्यवसायी/ भोगवटादार किंवा कोणतीही अन्य व्यक्ती यांच्याकडून

सदनिका, दुकान, वाहन उभी करण्याची जागा/ मोकळी जागा याचा अनधिकृत वापर करून होणारा उपद्रव;

(दोन) संस्थेच्या सदस्याकडून अथवा सदस्यांना आणि पदाधिकाऱ्यांना धमकी देणे/ त्यांच्यावर हल्ला करणे;

(तीन) पोलिसाच्या अखत्यारीत येणाऱ्या इतर कोणत्याही बाबी

**सर्वसाधारण सभेशी निगडित बाबी.**

**(फ) सर्वसाधारण सभा (General Body of the Society)**

(एक) संस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन समितीकडून न होणे;

(दोन) संस्थेच्या दर्शनी भागावर फलक न लावणे;

(तीन) संस्थेच्या सदस्याकडून उपविधी मधील तरतुदीचे पालन न झाल्यामुळे अशा कृतीसाठी व्यवस्थापन समितीने आकारलेला जादा दंड;

(चार) उपलब्ध मोकळ्या जागेचा कायदेशीर वापर करण्यास व्यवस्थापन समितीचा विरोध;

(पाच) व्यवस्थापन समितीकडून संस्थेच्या मालमत्तेचा विमा न काढणे;

(सहा) वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक;

(सात) सर्वसाधारण सभेच्या अखत्यारीतील इतर बाबी.

**संघाशी निगडित बाबी**

**(ग) गृहनिर्माण संघ (जिल्हा/ राज्य)**

खालील उल्लेखिलेल्या बाबी :-

(एक) सदस्यांकडून संस्थेच्या सचिवास प्रवेश नाकारणे.

(दोन) सदस्य/ व्यवस्थापन समिती यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न स्वीकारणे.

(तीन) संबंधित जिल्हा/सहाय्यक निबंधकांनी दिलेल्या निदेशानुसार उपविधी क्र. ९६ अन्वये विशेष सर्वसाधारण सभा बोलाविणे आणि उपविधी क्र. १३२ अन्वये व्यवस्थापन समितीची सभा बोलविणे.

(चार) संघाच्या उपविधीच्या तरतुदीनुसार यासारख्या इतर बाबी.

---

## संस्थेतील थकबाकी वसूलीची कारवाई कशी करावी.

सह. गृह संस्थेत सभासदांची थकबाकी असेल, तर त्याचा तपशील लेखापरिक्षणात, ताळेबंदात येणे आवश्यक आहे. थकबाकीदारांची यादी, त्यांची थकीत रक्कम तसेच त्यावर संस्थेने लावलेल्या व्याजाची रक्कम हे सर्व लेखापरिक्षण अहवालात येणे आवश्यक. लेखापरिक्षण अहवाल लेखापरिक्षकाकडून मिळाल्यावर संस्थेने थकबाकीदाराला विहित नमुन्यात १५-१५ दिवसांच्या अंतराने ३ सूचनापत्र (नोटीसेस) पाठवावीत. त्यानंतरही थकबाकीदाराने रक्कम भरली नाही तर उपनिबंधकांकडे वसुली दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल करावा. या अर्जासोबत, पाठवलेल्या सूचनापत्रांच्या प्रती, संस्थेचा थकबाकी वसूली बाबतचा ठराव, व्याजाचा ठराव इ. कागदपत्रे जोडावीत. उपनिबंधक कागदपत्रांची छाननी करून थकबाकीदाराला पुन्हा नोटीसेस पाठवितात. त्यानंतर संस्थेला वसुली दाखला मिळतो.

वसुली दाखला मिळाल्यानंतर महासंघाकडे प्रत्यक्ष वसुली कारवाईसाठी देणे आवश्यक. महासंघाच्या वसुली अधिकाऱ्यांकडून जप्ती पर्यंतची कारवाई करून संस्थेची देणी वसूल करून दिली जातात. वसूलीची प्रक्रिया सविस्तर समजाऊन घेण्यासाठी तसेच दावा तयार करण्यासाठी महासंघाशी संपर्क साधावा.

**- वसुली अधिकारी -**

**श्रीकांत पवार - ९४०३९७८९४३ । विठ्ठल खेडेकर - ९८९०४४८१७७ । मिलींद यादव - ७५५८५३७६९६**

***

# अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे

**सरकारी नोकर किंवा लोकप्रतिनिधी यांनी लाचेची मागणी केल्यास संपर्क करा –**

**टोल फ्रि क्रमांक – 1064**

**दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802**
**(2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**
**Mobile App - www.acbmaharashtra.net**

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

# लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

**कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.**

**भ्रष्टाचारासंबंधी ऑनलाईन तक्रार येथे नोंदवा.**

**कोणत्याही शासकीय कार्यालयात लाचेची मागणी होत असल्यास संपर्क साधा**

**तर करा फक्त एक फोन 1064 किंवा 403781064**

**दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802 | (2) 020 - 26122134**

**E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in**


## पुणे मनपा सहाय्यक आयुक्त कार्यालय तपशील

पुणे मनपा कार्यक्षेत्रात सर्व क्षेत्रीय कार्यालयात **दर महीन्याच्या शेवटच्या गुरुवारी ११ वाजता** नागरिकांच्या तक्रारींसंदर्भात **मोहल्ला कमिटी बैठक** असते. या बैठकीसाठी मनपाचे रस्ते, पाणी, आरोग्य, विद्युत, मलनिस्सारण विभागाचे अधिकारी उपस्थित असतात.

सहकारी गृह संस्थांच्या सभासद/पदाधिकारी यांनी आपापल्या भागातील क्षेत्रीय कार्यालयातील बैठकीला उपस्थित राहून तक्रारी नोंदवाव्यात व पाठपुरावा करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | ढोले पाटील रोड | – ०२० २५५९७३९४ |
| २) | येरवडा – कळस धानोरी | – ०२० २५५०९१०० |
| ३) | नगर रोड, वडगाव शेरी | – ०२० २५५०९००० |
| ४) | शिवाजीनगर – घोले रोड | – ०२० २५५०१५०० |
| ५) | कोथरुड – बावधन | – ०२० २५५०१६०० |
| ६) | औंध – बाणेर | – ०२० २५५०९७१० |
| ७) | धनकवडी – सहकारनगर | – ०२० २५५०८९०४ |
| ८) | वारजे कर्वेनगर | – ०२० २५५५९७७० |
| ९) | सिंहगड रोड | – ०२० २५५०८२०० |
| १०) | कोंढवा–येवलेवाडी | – ०२० २५५०८८०० |
| ११) | हडपसर – मुंढवा | – ०२० २५५९७४०० |
| १२) | वानवडी – रामटेकडी | – ०२० २५५९७४०० |
| १३) | कसबा – विश्रामबागवाडा | – ०२० २५५९७६०० |
| १४) | भवानी पेठ | – ०२० २५५०७२०० |
| १५) | बिबवेवाडी | – ०२० २५५०८७०० |

***

# ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत

**सभासदांना संस्थेकडून विविध कारणासाठी उदा. सदनिका विक्री करणे, गहाण ठेवणे, दुरुस्ती करणे, भाड्याने देणे इत्यादी बाबत नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**सहकारी गृहनिर्माण संस्था...**

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
जा.क्र. गृह/डी-३/परिपत्रक नाहरकत प्रमाणपत्र/१४-साआ
दिनांक : ०१ जानेवारी, २०१७

**: परिपत्रक :**

राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच प्रिमायसेस सहकारी संस्था यांचे सभासद सदनिका/गाळा विक्री करणे, गहाण ठेवणे, भाड्याने देणे, दुरुस्ती व अंतर्गत बदल करणे इ. कारणासाठी संस्थेकडे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करीत असतात.

याबाबत सभासदांच्या गरजेनुसार संस्थेकडून वेळेवर ना हरकत प्रमाणपत्र मिळत नाही. ना हरकत पत्रातील अटी व शर्ती बाबत सभासद व संस्था यांच्यात अनेकदा मतभेद निर्माण होतात, निबंधकाकडे देखील या संबंधी मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत असतात. त्याअनुषंगाने सविस्तर सुचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. सभासदास ज्या कारणासाठी ना हरकत प्रमाणपत्र पाहिजे ते कारण नमूद करुन सभासदाने लेखी अर्ज संस्थेकडे सादर करावा व अर्जाची रीतसर पोहोच घ्यावी. संस्थेने अर्ज न स्वीकारल्यास अथवा पोच न दिल्यास रजिस्टर ए डी ने / स्पीड पोस्टने संस्थेस अर्ज पाठवावा.

२. संस्थेने सभासदांकडून ना हरकत प्रमाणपत्र मागणी अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकानंतरच्या घेण्यात येणाऱ्या लगतच्या व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावा व त्या सभेत निर्णय घेऊन ना हरकत प्रमाणपत्र तात्काळ सभासदास देणेत यावे.

३. सभासदास ज्या कारणासाठी संस्थेकडून ना हरकत प्रमाणपत्र हवे आहे, त्याबाबत आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित सभासदाची राहील. तसेच अशा सभासदांकडून संस्थेची येणेबाकी असल्यास सभासदाने ती अर्जाचे वेळी संस्थेकडे भरली पाहीजे आणि संस्थेने अशी येणे रक्कम वसुल करुन घेऊन ना हरकत प्रमाणपत्र दिले पाहीजे.

**४. आदर्श उपविधीमध्ये सदनिका / गाळा खरेदीसाठी एम्प्लॉयर, बँक, एल. आय. सी. वगैरेकडून कर्ज घेण्यासाठी संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असणार नाही अशा स्वरुपाची तरतुद असली तरी सभासदांनी मागणी केल्यास असे ना हरकत प्रमाणपत्र देणे संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच अशी यंत्रणा विशिष्ट नमुन्यात ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करत असतात. अशावेळी संस्थेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या आधारे मागणी केलेल्या विशिष्ट नमुन्यात संस्थेने सभासदास ना हरकत प्रमाणपत्र द्यावे.**

५. सभासदाने अर्जासोबत विशिष्ट नमुना सादर केलेला नसल्यास संस्थेने सोबत जोडलेल्या नमून्यात सभासदास ना हरकत प्रमाणपत्र द्यावे. (सोबत नमुना)

६. ना हरकत प्रमाणपत्र मागणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर नजिकच्या काळात काही कारणास व्यवस्थापन समिती सभा होऊ शकत नसल्यास आणि सभासदास तातडीची गरज असल्यास अर्ज प्राप्त झाल्यानंतर अध्यक्ष व सचिव यांचे संयुक्त स्वाक्षरीने ७ दिवसाच्या आत ना हरकत प्रमाणपत्र देणेत यावे व त्याची कार्योत्तर मान्यता व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेत घ्यावी.

७. संस्थेकडे नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर संस्थेने नजिकच्या आस्थापन समिती सभेत निर्णय न घेतल्यास किंवा सभासदांची तातडीची गरज असुनही संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी असे प्रमाणपत्र उपरोक्त नमूद मुदतीत न दिल्यास अथवा पुरेशा

कारणाशिवाय नाकारल्यास सभासदास संबंधित निबंधकाकडे अर्ज करता येईल, असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर निबंधक सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकुन घेऊन ना हरकत दाखला देण्याबाबत संस्थेस आदेशीत करेल.

वरील प्रमाणे दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करुन संस्थांनी सभासदांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी.

x x x

**(चंद्रकांत दळवी)**
सहकार आयुक्त वा निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

३. अध्यक्ष / सचिव, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे फेडरेशन (सर्व)

त्यांना कळविणेत येते की, सदरच्या परिपत्रकीय सूचना सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निदर्शनास आणुन द्याव्यात.

***

जा. क्र. नाहरकत प्रमाणपत्र / /२०.....
.............. गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. ........
दिनांक / /२०.....

---

## : ना-हरकत प्रमाणपत्र : (नमुना)

अर्जदार श्री. / श्रीमती .................................... सभासद अनुक्रमांक ............ सदनिका/गाळा क्र. ............ हे आमच्या संस्थेचे सभासद असून त्यांनी संस्थेकडे ........................... या कारणासाठी संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी दिनांक ................. रोजी विनंती अर्ज सादर केला आहे.

१. संस्थेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन अर्जदार यांनी (अ) सदरची सदनिका कोणत्याही वित्तीय संस्थेकडे तारण ठेवलेचे दिसून येत नाही/(ब) .................. या वित्तीय संस्थेकडे रु. ............ इतक्या कर्ज रक्कमेपोटी तारण ठेवली असल्याचे दिसून येत आहे. (लागू नसेल ते खोडावे)

२. सबब, वरील बाबीस अधिन राहून अर्जदारास (अ) सदरची सदनिका विक्री करण्यास / (ब) सदनिका दुरुस्ती करण्यास / (क) सदनिका गहाण ठेवून कर्ज घेण्यास / (ड) .................................. या कारणासाठी संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. (लागू नसेल ते खोडावे)

३. सदरचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी संस्थेस उपलब्ध करुन दिलेल्या व संस्थेकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे देणेत येत आहे.

| सचिव | अध्यक्ष |
|---|---|
| ------- गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., | ------- गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., |

**शिक्का**

# शंका-समाधान

**प्रश्न १ : सह. गृह संस्थेत सदस्य कोणाला म्हणावे?**

**उत्तर :** संस्थेच्या नोंदणी अर्जात सहभागी झालेली व्यक्ती किंवा नोंदणीनंतर सदस्य म्हणून यथोचितरित्या दाखल करून घेतलेली व्यक्ती जिने मालमत्तेचे हक्क, हितसंबंध, मालकी हक्क व्यक्तीशः किंवा संयुक्तरित्या धारण केले आहे व भाग पत्रावर जिचे नाव प्रथम स्थानी आहे असा आहे. [ उपविधी क्र. ३ (चोवीस)]

**प्रश्न २ : सहयोगी सदस्य कोण होऊ शकतो?**

**उत्तर :** नवरा, बायको, आई, वडील, बहिण, भाऊ, मुलगा, मूलगी, सून, जावई, भाचा, भाची, पुतण्या, पुतणी या सदस्याशी असलेल्या वरील नात्यांपैकी एक व्यक्ती. सदस्याच्या लेखी शिफारशीनुसार आणि परवानगीनुसार सहयोगी सदस्यत्वाचे हक्क बजावू शकते. मात्र तिचे नाव भागपत्रावर येत नाही. (महा. शा. राजपत्र ९ मार्च २०१९ - १५४ब १८(अ)

**प्रश्न ३ : सहसभासद कोण होऊ शकतो?**

**उत्तर :** ज्याने सदस्यत्वासाठी सदस्यासह संयुक्तरित्या अर्ज केला आहे व ज्याने मालकी हक्क व हितसंबंध धारण केले आहेत, मात्र त्याचे नाव भागपत्रावर प्रथमस्थानी नसेल अशी व्यक्ती सहसभासद होऊ शकते. (१५४ ब १८ (ब).

**प्रश्न ४ : तात्पुरता सभासद कोणाला होता येईल?**

**उत्तर :** सदस्याच्या मृत्युनंतर त्याची नामनिर्देशीत व्यक्ती तात्पुरत्या सभासदत्वासाठी अर्ज करू शकते. मात्र कायदेशीर वारसनोंद होईपर्यंत त्याला तात्पुरता सभासद म्हणून संस्थेच्या कामकाजात भाग घेता येईल. (१५४ ब १८ (क).

**प्रश्न ५ : नामनिर्देशीत व्यक्तीचे नाव भागपत्रावर येऊ शकते का?**

**उत्तर :** नाही. सभासदाच्या मृत्यूनंतर नामनिर्देशीत व्यक्तीला संस्था तात्पुरते सभासदत्व देऊ शकते. मात्र कायदेशीर वारसनोंद झाल्याशिवाय वारसांची नावे भागपत्रावर येणार नाहीत.

**- मनीषा कोष्टी**
सचिव

***

*With Best Compliments From*

**Structural Auditor**

**Indrakumar Jagtap**

B.E. (Civil), CHARTERED ENGINEER

**Mobile : 9822332510 * Email : indrakumar.jagtap@gmail.com**
**Web : www.structuralauditorpune.com**

**1, Vyankateshwara Society, Inside From Trimurti Hospital,**
**Sinhgad Road, Vadgaon Budruk, Pune 411041.**

# : महासंघाचे सहकार दरबार :

| अ.क्र. | सहकार दरबारचे नाव | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **धनकवडी –** रक्षालेखा सोसा., सर्व्हे क्र. ३०, विक्रमनगर, धनकवडी-४३. | पहिला रविवार<br>**श्री. शिवाजी उराडे** | (स. ११ ते १)<br>९४२३०१५९९६ |
| २. | **पिंपळे सौदागर –** गणेश रेसिडेन्सी, लोटस हॉस्पिटल जवळ, पिंपळे सौदागर, पुणे-२७. | पहिला रविवार<br>**श्री. चारुहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| ३. | **चिंचवड –** गोखले वृंदावन सोसा., चाफेकर चौक, चिंचवड, पुणे-३३. | दुसरा गुरुवार<br>**श्री. सुभाष कर्णिक** | (स. ११ ते १)<br>९७६६६०६१४६ |
| ४. | **मुख्य कार्यालय –** ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे-३०. | तिसरा शनिवार<br>**ॲड. प्रकाश तोंडारे** | (स. ११ ते १)<br>०२०-२४४५४०१० |
| ५. | **स्वप्नशिल्प –** स्वप्नशिल्प सोसा., वारजे क्षेत्रीय कार्यालयाजवळ, कोथरुड, पुणे-३८. | चौथा शनिवार<br>**श्री. सुभाष ढवळे** | (स. ११ ते १)<br>९४२१०५८२५५ |
| ६. | **तळेगाव दाभाडे –** समाज मंदिर (संस्था कार्यालय), समाज सेवक सह. गृह. संस्था म. (रेव्हेन्यू कॉलनी), चाकण रोड, फिश मार्केटच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे-४१०५०७. | चौथा रविवार<br>**ॲड. ज्योत्स्ना जोशी** | (स. ११ ते १)<br>९२६०२०१६५० |
| ७. | **सहकारनगर –** श्रीगजलक्ष्मी सह. गृह संस्था, सर्व्हे क्र. ८२/२अ, सहकारनगर-१, गांधी ट्रेनिंग कॉलेजसमोर, पुणे-०९. | दुसरा शनिवार<br>**श्री. श्रीराम कुंचुर** | (स. ११ ते १)<br>९४२२०१२१५६ |
| ८. | **औंध –** सुरोभी पार्क, ई-६०३, डीएसके आकाशगंगा शेजारी, नागरस रोड | दुसरा रविवार<br>**सौ. प्रीती शिरोडे** | (सायं. ४ ते ६)<br>९२८४५८८६३४ |
| ९. | **कोंढवा – कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८. | चौथा रविवार<br>**श्री. अव्हेलिनो नरोना** | (स. ११ ते १)<br>९९७०४७३१८९ |
| १०. | **सिंहगड रोड –** ट्युलिप सोसायटी, नवशा मारुती जवळ, पुणे – ४११०५१. | पहिला रविवार<br>**श्री. विलास थोरात** | (स. ११ ते १)<br>९८९००५४३५१ |
| ११. | **हिंजवडी –** यशवन सोसायटी, हिंजवडी,VJ एव्हेन्यू जवळ, माण रस्ता | पहिला शनिवार<br>**श्री. चारूहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| १२. | **गेरा एम्पोरियम गेटवे ए आणि सी कमर्शियल कॉम्प्लेक्स–** नाशिक फाटा, मेट्रो स्टेशन, कासारवाडी | चौथा शनिवार<br>**श्री. अभिजीत कुलकर्णी**<br>(सहकार मित्र) | (स. ११ ते १)<br>८८८८७२३४५ |

## ✻ महत्त्वाचे निवेदन ✻

**सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कामकाज सुरळीत, पारदर्शक करण्यासाठी महासंघातर्फे १ दिवसीय, ३ दिवसीय तसेच सोसायटीमध्ये जाऊन समिती, व्यवस्थापक व सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.**

**संस्थेने उपविधी क्रमांक ६७(अ) चौदा नुसार १० रु. महिना प्रमाणे प्रत्येक सभासदाकडून घेतलेला शिक्षण निधी या प्रशिक्षणासाठी खर्च करायचा आहे.**

**प्रशिक्षणाच्या अधिक माहितीसाठी महासंघ कार्यालयाशी संपर्क साधावा.**

**०२०-२४४५४०१० / ९११२१९१६११ / ९६८९८९८३६०**

# नियमित पान

प्रत्येक सहकारी संस्थेला आपल्या संकुलातील इमारतींची देखभाल बघावी लागते. त्यासाठी संस्था प्रत्येक सभासदाकडून सर्वसाधारण सभेने ठरविल्याप्रमाणे मासिक देखभाल खर्च घेत असते. बहुसंख्य सभासद सदर रक्कम नियमितपणे भरतात, पण काही सभासद विविध कारणासाठी सदर रक्कम भरत नाहीत. त्यांना वेळोवेळी संस्थेतर्फे स्मरणपत्रे, कायदेशीर सूचना पाठवल्या जातात. अशा सूचना मिळाल्यावर काही सभासद देखभाल रकमेची थकीत रक्कम भरतात; परंतु काही सभासद आठमुडेपणे सदर रक्कम भरत नाहीत. अशा सभासदांच्या विरुद्ध संस्थेची कार्यकारणी मॉडेल बायलॉज प्रमाणे संबंधित उपनिबंधक यांचेकडे तक्रार करते.

याबाबत एक तरतूद लक्षात घेणे आवश्यक आहे. सदनिका फक्त एकाच्या नावावर असेल, तर शेअर सर्टिफिकेटवर त्याचेच नाव असते. मात्र सदनिका दोन किंवा अधिक व्यक्तींनी एकत्रित खरेदी केली असेल, तर शेअर सर्टिफिकेटवर त्या सर्वांच्या नावाची नोंद केली असते. शेअर सर्टिफिकेट मधील पहिले नाव असलेल्या व्यक्तीला संस्थेचे सभासद करून घेण्यात येते. इतर हक्कदार सहसभासद असतात. त्यामुळे मासिक देखभाल रक्कम देण्याची जबाबदारी सर्व भागीदारीकांची असते.

यास्तव मासिक देखभालीचे थकित रकमेबद्दल संस्थेने सर्व भागधारकांना सूचना देणे आवश्यक ठरते. तसेच उपनिबंधकांक अर्ज करताना शेअर सर्टिफिकेट वरील सर्व भागधारकांची नावे द्यावीत. उप निबंधक यांना वसुलीचा आदेश सर्व भागधारकाच्या नावाने काढता येईल. त्यामुळे थकीत रक्कम भरण्याची जबाबदारी सर्व भागधारकांची असेल.

उप निबंधकांनी दिलेल्या वसुलीचा आदेश संस्थेने महासंघाकडे दिल्यावर महासंघाचे वसुली अधिकारी सदर रक्कम वसूल करण्याच्या दृष्टीने आवश्यक कृती करतात. कायदेशीर सूचना, जप्तीची सूचना, प्रत्यक्ष जप्ती, बँकेचे खाते गोठविणे इत्यादी मार्गाने कार्यवाही होते.

मात्र महासंघाकडे वसुली आदेश दिला म्हणजे संस्थेची जबाबदारी संपली असे होत नाही. या सर्व कार्यवाहीत संबंधीत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग आणि सहकार्य अतिशय महत्त्वाचे असते.

माझी सर्व पदाधिकाऱ्यांकांना विनंती की वसूली आदेश महासंघाकडे दिल्यावर महासंघाच्या संबंधित अधिकाऱ्यास त्यांनी मागितल्यावर आवश्यक माहिती द्यावी. त्यामुळे त्यांचे वसूलीचे काम सुलभ होईल.

धन्यवाद

**– सुभाष चं. कर्णिक**
उपाध्यक्ष

***

## एप्रिल २०२६ मध्ये एकूण १६ संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. महासंघ त्यांचे स्वागत करीत आहे.

१) **जयगड सह. गृह. संस्था, मर्या.**, भोसरी, पुणे ४११०२६.
२) **अनुश्री सह. गृह. संस्था, मर्या.**, एरंडवणे, पुणे ४११००४.
३) **विवांता सह. गृह. संस्था, मर्या.**, ताथवडे, पुणे ४११०३३.
४) **कुमार प्रसन्न सह. गृह. संस्था, मर्या.**, वानवडी, पुणे ४११०४०.
५) **तिरुपती पॅराडाईज सह. गृह. संस्था, मर्या.**, विश्रांतवाडी, पुणे ४११०१५.
६) **ओम केदारेश्वर सह. गृह. संस्था, मर्या.**, कसबापेठ, पुणे ४११०११.
७) **अॅड्रेस वन फेज–२ आणि ४ सह. गृह. संस्था, मर्या.**, गहुंजे, पुणे ४१२१०१.
८) **महाडकर रेसिडन्सी बी १ सह. गृह. संस्था, मर्या.**, कोथरुड, पुणे ४११०३८.
९) **कोहिनूर इस्टेट सह. गृह. संस्था मर्या.**, खडकी, पुणे ४११००३.
१०) **महानंद सह. गृह. संस्था मर्या.**, कोंढवा (बु.), पुणे ४११०४८.
११) **सत्यम शिवम फेज २ सी आणि डी बिल्डिंग सह. गृह. संस्था, मर्या.**, खराडी, पुणे ४११०१४.
१२) **वसंत विहार बी विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, नऱ्हे, पुणे ४११०४१.
१३) **गंगा सिरिओ सह. गृह. संस्था, मर्या.**, खराडी, पुणे ४१०१४.
१४) **स्कायवेज हार्मोनी सह. गृह. संस्था, मर्या.**, लोहगाव, पुणे ४११०४७.
१५) **इंद्रायणी अपार्टमेंट सह. गृह. संस्था, मर्या.**, वडगाव मावळ, पुणे ४१२१०६.
१६) **तारा रेसिडेन्सी अपार्टमेंट कंडोमिनियम सह. गृह. संस्था, मर्या.**, कोथरुड, पुणे ४११०३८.

***



सकाळ मॅनेजर ट्रेनिंग – दिनांक १७ एप्रिल २०२६
उपस्थित प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक महासंघाच्या
सचिव मनीषा कोष्टी, संचालक ॲड. मृद्‌गंधा जोशी

सकाळ मॅनेजर ट्रेनिंग – दिनांक १७ एप्रिल २०२६
उपस्थित प्रशिक्षणार्थी तसेच प्रशिक्षण महासंघाचे
अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, कोषाध्यक्ष
श्री. चारुहास कुलकर्णी, संचालक श्री. ॲव्हेलिनो
नरोना, SHMAC चे श्री. अमित मांजरे,
महासंघाचे तांत्रिक व्यवस्थापक श्री. भीम बलकवडे





सकाळ मॅनेजर ट्रेनिंग
दिनांक १७ एप्रिल २०२६

सकाळ मॅनेजर ट्रेनिंग
दिनांक १७ एप्रिल २०२६





राष्ट्रीय सहकार धोरण या विषयीच्या बैठकीसाठी मुंबई येथे उपस्थित महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, नवी मुंबई महासंघाचे सचिव श्री. भास्कर म्हात्रे, ठाणे महासंघाचे अध्यक्ष श्री. सीताराम राणे, तज्ञ संचालक ॲड. श्रीप्रसाद परब आणि सहकार तज्ञ श्री. विद्याधर अनास्कर.
दि. १६ एप्रिल २०२६




दि. १० एप्रिल २०२६ कलाग्राम, पु. ल. देशपांडे उद्यान सहकार महोत्सवात महासंघाच्या दालनास स्माईल सहेलीच्या संचालक संजीवनी जोगळेकर यांची भेट. महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, सचिव मनीषा कोष्टी, संचालक शिवाजी उराडे आणि व्यवस्थापक श्री. भीम बलकवडे.

**संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणभाष क्रमांक तसेच ई-मेल आय.डी. कृपया महासंघाला कळवावेत.**

''वास्तु-दर्शन'' च्या अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी आणि जाहिरातींशी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ सहमत असेलच असे नाही.

मा. अध्यक्ष / सचिव